# ॥ महाराष्ट्र ॥

# दर्शन

## पर्यटन मार्गदर्शिका





लेखन आणि संपादनः
**रमेश जोशी**


**किल्ले, थंड हवेची ठिकाणे, गुंफा, सागर किनारे, अभयारण्ये व तीर्थस्थळांची माहिती**

# महाराष्ट्र दर्शन

## पर्यटकांसाठी मार्गदर्शक पुस्तिका

---

संकलन, लेखन आणि संपादन :
**रमेश जोशी**

सातम उद्योग™
www.satamudyogbooks.com

ISBN : 978-81-974443-9-5

**ई-बुक आवृत्ती**

☐ संकलन, लेखन आणि संपादन : **रमेश जोशी**

☐ प्रकाशक : **हेमंत स. साटम**

☐ मुद्रक : **साटम उद्योग**
२०३, अमित इंड. इस्टेट, लालबाग, मुंबई-४०० ०१२.
८१६९९ ८४९२७

© **सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.**
प्रकाशकाच्या परवानगीशिवाय या पुस्तकातील मजकूर, छायाचित्रे कोणत्याही प्रकारे पुनर्मुद्रित वा इतर भाषेत रुपांतरित करता येणार नाही.

**विशेष नोंद :**
ही पुस्तिका केवळ मार्गदर्शनपर आहे. त्यातील माहिती अद्यावत व अचूक करण्याचा अधिकाअधिक प्रयत्न करण्यात आला आहे. असे असले तरी काही त्रुटी, तसेच टेलिफोन क्रमांकातील बदल राहून गेले असल्यास त्याला प्रकाशक व विक्रेता जबाबदार राहणार नाहीत. संपूर्ण अद्यावत माहितीसाठी कृपया संबंधित विभागांशी संपर्क साधावा.

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | दृष्टीक्षेपात महाराष्ट्र ........................ | ४ |
| २. | पर्यटन म्हणजे निर्मळ आनंद ........................ | ८ |
| ३. | महाराष्ट्राची पूर्वपीठिका ........................ | १२ |
| ४. | महाराष्ट्रातील किल्ले ........................ | १५ |
| ५. | प्रमुख थंड हवेची ठिकाणं ........................ | ३२ |
| ६. | डोंगरदऱ्यातील लेण्या ........................ | ४० |
| ७. | सागर किनारे (बीचेस) ........................ | ४९ |
| ८. | जंगले व अभयारण्ये ........................ | ५६ |
| ९. | देवीची साडेतीन शक्तिपीठे ........................ | ६५ |
| १०. | अष्टविनायक ........................ | ६८ |
| ११. | महाराष्ट्रातील पाच ज्योतिर्लिंगे ........................ | ७३ |
| १२. | प्रसिध्द मंदिरे-देवस्थाने व प्रेक्षणीय स्थळे ............ | ७६ |
| १३. | एम.टी.डी.सी. : कार्यालये व माहिती केंद्रे .......... | १०४ |

# एक : दृष्टीक्षेपात महाराष्ट्र

**राज्य स्थापना** : १ मे, १९६०

**राजधानी** : मुंबई

**उप राजधानी** : नागपूर

**राजभाषा** : मराठी

**राज्यवृक्ष** : आंबा

**राज्य खेळ** : कबड्डी

**राज्य नृत्य** : लावणी

**इतर बोली भाषा** : मुख्यत: हिंदी, इंग्रजी, गुजराती

**क्षेत्रफळ** : ३०७,७१३ चौ.कि.मी.

**लोकसंख्या** : सुमारे ११.२४ कोटी

**सीमा** : पूर्व : छत्तीसगड
पश्चिम : अरबी समुद्र
उत्तर : गुजरात, मध्य प्रदेश व दादरा-नगर हवेली,
दक्षिण : गोवा, कर्नाटक, तेलंगण

**सागर किनारा** : ७२० कि.मी. (अरेबियन समुद्राचा पश्चिम किनारा)

**एकूण बंदरे** : ५१

**प्रमुख बंदरे** : मुंबई, न्हावाशेवा (आंतरराष्ट्रीय), मुरुड, दाभोळ, जयगड, रत्नागिरी, देवगड

**मुख्य पर्वत** : सह्याद्री (दक्षिणोत्तर), सातपुडा (पूर्व-पश्चिम)

**पर्वतांच्या उपरांगा** : सातमाळा, अजिंठा, हरिश्चंद्र, बालाघाट, महादेव

**मुख्य घाट** : थळ, माळशेज, बोर, वरंधा, कुंभार्ली, आंबा, फोंडा, आंबोली, कात्रज, खंबाटकी, दिवा व औट्रम घाट.

**सर्वोच्च पर्वत शिखर** : कळसूबाई, जिल्हा-अहमदनगर, उंची : १६४६ मीटर

**प्रमुख ऐतिहासिक किल्ले** : ४५

**प्रमुख नद्या** : गोदावरी, कृष्णा, तापी, भीमा, कोयना, वर्धा, वैनगंगा, प्रवरा

**राष्ट्रीय उद्याने** : ६

**अभयारण्ये** : ४७

**व्याघ्र प्रकल्प** : ६

**प्रमुख विमानतळ :** आंतरराष्ट्रीय-३, आंतरदेशीय-५

**प्रमुख सागरी किनारे ( सी बीचेस ) :** १ ७

**प्रमुख थंड हवेची ठिकाणे :** १ २

**धबधबे :** दादर-कोपरा (जव्हार), तिवरे-धारेश्वर (संगमेश्वर), सौतवडे (विजयदुर्ग), नागरा (आंबोली), रंधा (भंडारदरा), खंडाळा (लोणावळा), सहस्त्रकुंड (नांदेड), सौताडा (बीड)

**मोठी शहरे :** ३ ३, **प्रमुख विद्यापीठे :** २ ३

**राज्यातील ज्योतिर्लिंगे :** ५

**राज्यातील एकूण जिल्हे :** ३ ६, **तालुके :** ३ ५ ८

**प्रमुख प्राचीन शिल्पकलेची ठिकाणे :** ४ २

**उष्ण पाण्याचे झरे :** ५, **तलाव व जलाशये :** १ १

**रस्त्यांची लांबी :** सुमारे २.३ ९ लक्ष कि.मी.

**राष्ट्रीय महामार्ग :** अंदाजे ४ ३ ७ ६ कि.मी.

**लोहमार्ग :** अंदाजे ५ ९ ८ ३ कि.मी.

## ■ प्रमुख राष्ट्रीय मार्ग :

**राष्ट्रीय मार्ग क्र. ३** : मुंबई-नाशिक-धुळे-इंदूर-आग्रा

**राष्ट्रीय मार्ग क्र. ४** : ठाणे-पुणे-बंगलोर-चेन्नई

**राष्ट्रीय मार्ग क्र. ६** : धुळे-नागपूर-कलकत्ता

**राष्ट्रीय मार्ग क्र. ८** : मुंबई-सुरत-अहमदाबाद-जयपूर-दिल्ली

**राष्ट्रीय मार्ग क्र. ९** : पुणे-सोलापूर-हैद्राबाद-विजयवाडा

## ■ प्रमुख लोहमार्ग :

- ☐ **मुंबई-दिल्ली-अमृतसर**
- ☐ **नागपूर-दिल्ली**
- ☐ **जळगाव-सुरत**
- ☐ **मुंबई-वाराणसी**
- ☐ **मुंबई-हावडा**
- ☐ **नागपूर-चेन्नई**
- ☐ **मुंबई-चेन्नई**
- ☐ **मनमाड-हैद्राबाद**
- ☐ **नांदेड-हैद्राबाद**
- ☐ **मुंबई-बडोदा-दिल्ली**
- ☐ **कोकण रेल्वे-मुंबई-रत्नागिरी**

**प्रमुख महानगरे :** मुंबई, ठाणे-कल्याण, पुणे, पिंपरी-चिंचवड, कोल्हापूर, सोलापूर, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर

## ■ प्रशासकीय विभाग :

**महसुली विभाग** : कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर

**कोकण विभाग** : मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग (७ जिल्हे)

**नाशिक विभाग** : नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर (५ जिल्हे)

**पुणे विभाग** : पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर (५ जिल्हे)

**औरंगाबाद विभाग** : औरंगाबाद, जालना, परभणी, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली (८ जिल्हे)

**अमरावती विभाग** : बुलढाणा, अकोला, वाशीम, यवतमाळ व अमरावती (५ जिल्हे)

**नागपूर विभाग** : वर्धा, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, गोंदिया (६ जिल्हे)

# ■ जिल्हा निहाय प्रमुख पर्यटन स्थळं :

**मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा** : गेटवे ऑफ इंडिया, हुतात्मा चौक, प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, भुलेश्वर, राजाबाई टॉवर, नवे विधान भवन, वानखेडे स्टेडियम, छत्रपती शिवाजी टर्मिनस, चौपाटी, मरीन ड्राइव्ह, मणी भवन, मलबार हिल, बाबुलनाथ, बाणगंगा, महालक्ष्मी, हाजीअली, नेहरु सेंटर, राणीचा बाग, दादर-चौपाटी, जुहू, वर्सोवा, फिल्मसिटी, कान्हेरी गुंफा, सांताक्रूझ व सहार विमानतळ, नॅशनल पार्क

**ठाणे** : अर्नाळा, अंबरनाथ, घोडबंदर, जव्हार, टिटवाळा, डहाणू, तानसा, माळशेज घाट, मलंगगड, लोनाड, वज्रेश्वरी, गणेशपुरी, वैतरणा

**रायगड** : अलिबाग, आक्षी-नागाव, उन्हेरे, कनकेश्वर, कर्नाळा, किहीम बीच, खांदेरी-उंदेरी, घारापुरी, चौल, न्हावाशेवा, सुधागड, महड, महाड, माथेरान, मुरुड-जंजिरा, रायगड, शिवथर घळ, हरिहरेश्वर, श्रीवर्धन

**रत्नागिरी** : अडिवरे, डेरवण, गणपतीपुळे, जयगड, परशुराम, पावस, पूर्णगड, मालगुंड, सुवर्णदुर्ग, हर्णे, राजापूर, वेळणेश्वर, संगमेश्वर, गुहागर, हेदवी, रत्नागिरी

**सिंधुदुर्ग** : आंबोली घाट, बांदा, माणगाव, रेडी, विजयदुर्ग, सावंतवाडी, शिरोडा, सिंधुदुर्ग, तारकर्ली, मालवण, वेंगुर्ला, दाणोली, कणकवली, कुणकेश्वर

**नाशिक** : त्र्यंबकेश्वर, नाशिक, पांडवलेणी, चांभारलेणी, गंगापूरधरण, टाकळी, मांगीतुंगी, सप्तशृंगीगड, नांदूर मधमेश्वर

**जळगाव** : अंमळनेर, उनपदेव, चोरवड, चांगदेव, पद्मालय, पाटणादेवी, पाल, फरकांडा येथील मनोरे, मनुदेवी, पारोळा

**धुळे** : अनेर धरण व अभयारण्य, तोरणमाळ, प्रकाशे

**अहमदनगर** : अकोले, अरणगाव, कळसूबाई, चौंडी, देवगड, नेवासा, पुणतांबे, प्रवरा संगम, भंडारदरा, मढी, राळेगडसिध्दी, रेहेकुरी, शनि शिंगणापूर, शिर्डी, सिध्दटेक, हरिश्चंद्रगड, पारनेर.

**पुणे** : आळंदी, ओझर, कार्ले, खंडाळा, लोणावळा, चिंचवड, जेजुरी, तोरणा, थेऊर, देहू, नाणेघाट, पानशेत, पुरंदर, बनेश्वर, बेडसा, भाजे, भीमाशंकर, मोरगाव, रांजणगाव, लेण्याद्री, लोहगड-विसापूर, शिवनेरी, वडूज, सिंहगड

**सातारा** : कराड, कोयनानगर, गोंदवले, चाफळ, पालीचा खंडोबा, पाचगणी, प्रतापगड, महाबळेश्वर, माहुली, वाई, शिखर-शिंगणापूर, सज्जनगड, मेणवली

**सांगली** : औदुंबर, बत्तीस शिराळा, सांगली

**कोल्हापूर** : कुंभोज, कोल्हापूर, जोतिबा, नृसिंहवाडी, पन्हाळा, राधानगरी, विशाळगड

**सोलापूर** : अक्कलकोट, करमाळा, पंढरपूर, मंगळवेढा

**औरंगाबाद** : अजिंठा, उपळा, खुलताबाद, गौताळा, दौलताबाद, पितळखोरा, पैठण, म्हैसमाळ, वेरुळ, शूलिभजन

**जालना** : अंबड, जयदेववाडी, जांबसमर्थ

**परभणी-हिंगोली** : औंढा नागनाथ, गंगाखेड, नरसी

**नांदेड** : उनकेश्वर, किनवट, कंधार, गुरुद्वारा, माहूर, विष्णूपुरी, सहस्त्रकुंड

**लातूर** : उद्‌गीर, औसा, खरोसा लेण्या

**उस्मानाबाद** : डोमगाव, कुंथलगिरी, तुळजापूर, तेर, नळदुर्ग

**बीड** : अंबाजोगाई, कपिलधार, परळी वैजनाथ, धारुर, राक्षसभुवन

**बुलढाणा** : देऊळगाव राजा, मेहकर, लोणार, शेगाव, सिंदखेड राजा

**अकोला-वाशिम** : अकोट, कारंजा, नरनाळा किल्ला, बाळापूर, लोणी, वाशीम-मधमेश्वर

**अमरावती** : ऋणमोचन, कौंडिण्यपूर, गाविलगड, चिखलदरा, ढाकणे-कोळेकाज अभयारण्य, बहिरम, माधान, मेळघाट, मोझरी, रिथपूर, मुक्तागिरी

**यवतमाळ** : कळंब

**वर्धा** : पवनार, सेवाग्राम

**नागपूर** : कोराडी, खापरखेडा, खिंडसी, पेंच राष्ट्रीय उद्यान, बुटीबोरी, रामटेक

**भंडारा-गोंदिया** : नवेगाव बांध, नागझिरा अभयारण्य, पवनी, भंडारा

**चंद्रपूर** : ताडोबा राष्ट्रीय उद्यान, भद्रावती, सोमनाथ

**गडचिरोली** : मार्कंडा

□□□

# दोन : पर्यटन म्हणजे निर्मळ आनंद

**प**रदेशातील लोकांचा एक वाखाणण्यासारखा गुण म्हणजे त्यांच्या ठायी असलेली भ्रमंतीची उत्कट आवड. ज्याला इंग्रजी भाषेत 'वाँडर थर्स्ट' म्हणतात, अशी फिरस्तीची, मुशाफिरीची तहानच या लोकांमध्ये फार तीव्रतेने आढळते. नव्या जगाबद्दलची, अनोळखी प्रदेशाबद्दलची उत्कंठा, कुतुहल हेच त्यामागील मूळ कारण होय. या उत्कंठेमुळेच त्यांच्या ठायी फिरण्याचं वेड असतं. त्यासाठी साहस करण्याची, कष्ट सोसण्याची, गैरसोयीतही तडजोड करुन आनंद लुटण्याची त्यांची सहज प्रवृत्ती असते.

नित्य नव्या प्रदेशात हिंडणं, तेथे मुलुखगिरी करुन तेथील लोकजीवन, लोकसंगीताशी एकरुप होणं, तेथील इतिहास, संस्कृती, परंपरा, चालीरीती, कला, वाङ्मय यामध्ये रुची घेणं, तेथील निसर्ग, ऐतिहासिक वास्तू-शिल्पकला यांचा मनमुराद आनंद लुटणं, हा जणू या परदेशी लोकांना जडलेला छंदच आहे. भारतात दरवर्षी येणारे हजारो पर्यटक या छांदिष्टपणानेच सर्वत्र फिरतात. इथल्या यात्रा-सण यांचा आनंद घेतात, इथल्या वेगवेगळ्या पाककृती चाखून त्यांचा आवडीने आस्वाद घेतात.

परदेशी लोकांच्या ठायी असलेली ही मुलुखगिरीची आवड त्यामानाने भारतीय समाजात खूप कमी आहे. पण इतर राज्यांशी तुलना करता महाराष्ट्रीय समाजात ती फार कमी प्रमाणात आहे असं जाणवतं. महाराष्ट्रातील माणसाला भ्रमंतीची आवड नाही, असा त्याचा अर्थ होत नाही. तो भ्रमंती करतो पण कारणपरत्वे. लग्न समारंभ, शिक्षण, बदली किंवा धार्मिक परंपरा निभावून नेणे यासारख्या निमित्ताने तो घरातून बाहेर पडतो आणि बाहेर पडला म्हणून जाता जाता आजूबाजूच्या परिसरात भटकावं अशा मर्यादित अर्थाने त्याची भ्रमंती होते. अनेक लोक तीर्थयात्रा करण्याच्या निमित्ताने घराबाहेर पडतात. पण या पर्यटनामागील हेतू मात्र फार मोठं मिळवण्याचा नसतो.

तीर्थाटनाच्या हेतूने दरवर्षी महाराष्ट्रातील हजारो माणसे पंढरपूर, त्र्यंबकेश्वर, काशी, नाशिक, बद्रीकेदार, ह्रषिकेश-हरद्वार, वृंदावन आणि अशाच अन्य ठिकाणी मोठ्या भक्तीभावाने जातात. पण याला यात्रा म्हणता येईल. पर्यटन किंवा मुलुखगिरी या प्रकारात ती मोडणार नाही.

महाराष्ट्रीय माणसात अभावाने दिसणारी ही पर्यटनाबद्दलची आवड पाहता त्यामागे काही कारणं असू शकतील. काटकसरी स्वभाव, आर्थिक संपन्नतेचा अभाव, पर्यटनाखेरीज इतर अन्य महत्वाच्या विषयात असलेली रुची, सामाजिक जडणघडण अशी अनेक प्रकारची कारणपरंपरा या उदासीनतेमागे असू शकेल. पण महाराष्ट्रीय माणसाने ही मानसिकता हळूहळू बदलायला हवी.

पर्यटन म्हणजे मौजमजा, पैशांचा अपव्यय, असा काही लोकांचा समज असतो, तोही खरं तर चुकीचा आहे. खरं म्हणजे आजच्या धावपळीच्या जीवनात पर्यटन म्हणजे मनाला एकप्रकारचा विश्राम आहे. विसावा आहे. त्यामुळे एकसूरी जगण्याला कंटाळलेला जीव ताजातवाना होऊ शकतो. पर्यटनातून बाहेरच्या जगाबद्दलचं फार मोठं अज्ञान दूर होतं. वेगवेगळी माणसं, वेगवेगळे प्रदेश, वेगवेगळ्या भाषा आणि संस्कृती यांची ओळख होते. व्यवहारज्ञान वाढतं. अंगी साहस येतं. प्रसंगाला सामोरं जाण्याचं प्रसंगावधान येतं. इतरांशी जमवून घेण्याची वृत्ती वाढीला लागते. एकंदरीत माणूस आपल्या कोषातून बाहेर पडतो. माणूस माणसाच्या अधिक जवळ येतो. याशिवाय जगातल्या सृष्टीसौंदर्याचा, कला-शिल्प पाहण्याचा निर्मळ आनंद मिळतो तो निराळाच.

पर्यटनाने आणि मुलुखगिरीने माणसाचं मन अधिक मोठं होतं, यात शंका नाही. मराठी माणूस प्रसंगोचित प्रवास करतो, पण त्याने यापुढे केवळ मुलुखगिरी करण्याच्या हेतूनेच बाहेर पडायला हवं. पर्यटन म्हणजे फार दूर अंतराचा प्रवास केला पाहिजे, असंही नाही. अगदी जवळपासच्या अंतरावर एकदोन दिवसात परत येता येईल, अशी अनेक ठिकाणं आपल्याला माहीत नसतात. ती मुद्दाम जाऊन पाहिली तरी आनंद मिळतो. पर्यटनातील आनंदाचा अंतराशी काहीही संबंध नसतो. कधी कधी प्रसंगोचित प्रवास घडत असताना थोडी वाट वाकडी केली तरी कामाबरोबर पर्यटनाचीही मजा लुटता येते, खर्चही कमी होतो आणि लांबच्या प्रवासाची दगदगही होत नाही. इतर राज्यातली माणसं हा आनंद आवर्जून लुटतात. मराठी माणसानेही तो लुटावा आणि मन मोकळं करावं, असं वाटतं.

दरवर्षी किंवा नित्यनेमाने शिर्डीला जाणारी अनेक मंडळी आहेत त्यांनी येतांना परतीच्या प्रवासात नाशिकला मुक्काम केला तर एक दोन दिवसात त्र्यबंकेश्वर, ब्रम्हगिरी किंवा नाशिकच्या आसमंतातील अनेक स्थळांना भेटी देता येतील.

नगर, पुणे, सातारा, कोल्हापूर या ठिकाणी कधी जाणं झालं तर आसपासचे किल्ले, तीर्थस्थळं आणि या शहरातील ऐतिहासिक वास्तूंनाही भेट देता येईल. मुंबईतील कोकणवासी चाकरमानी माणसं तर दरवर्षी कोकणात सहकुटुंब जातात. गणेशोत्सव

किंवा मे महिन्याची सुटी बहुधा ही मंडळी कोकणात घालवतात. या निमित्ताने कोकणातील जलदुर्ग, सागर किनारे किंवा अनेक तिर्थस्थानांचीही सहज सफर होऊ शकते. कोकणातील निसर्ग हा कोकणी माणसाला खूप अंगवळणी पडल्यासारखा वाटतो, पण अशा सफरीच्या निमित्ताने त्याच्याकडे त्रयस्थपणे बघायला मिळतं. निसर्गातील चैतन्याचा आगळा साक्षात्कार होऊ शकतो. एरवी ओळखीच्या वाटणाऱ्या डोंगर-दऱ्या, त्यातून खळाळत ओसंडणारे अवखळ धबधबे, समुद्र किनारे, खाड्या, बंदरं आणि गर्द हिरव्या आमराया यामधील निसर्ग आपल्यापुढे अगदी नव्या नवरीचं रुप धारण करुन उभा राहतो. वेगळ्याच गुजगोष्टी करतो. श्री. ना. पेंडसे, गो. नि. दांडेकर, मधु मंगेश कर्णिक, चिं. त्र्य. खानोलकर, जयवंत दळवी यांच्या साहित्यात निसर्ग जसा जिवंत व्यक्तीसारखा वावरतो तसा अनुभव आपल्याला येऊ शकतो. सांगायचा मुद्दा इतकाच की, पर्यटनामुळे, मुलुखगिरीमुळे सभोवतालच्या विश्वाचं वेगळं दर्शन आपल्याला घडतं. त्यातून मिळणारा अनपेक्षित आनंद आपल्याला खूप खूप सुख देऊन जातो. अलिकडच्या काळात नोकरदार माणसांना दर दोन वर्षातून सहकुटुंब प्रवासासाठी खास आर्थिक लाभही मिळतात. त्यातूनही अशा लहान मोठ्या सफरी होऊ शकतात. कुटुंबही सुखावतं. पुढील पिढीलाही जगाची योग्यवेळी ओळख होते. बाहेरच्या जगाबद्दल अनाठायी भीती वाटण्याऐवजी त्याबद्दल प्रेम व आपुलकी वाटू लागते.

अलिकडे पूर्वीइतका प्रवासाचा त्रास राहिला नाही. खाजगी संस्थांतर्फे तर अशा अनेक सफरी आयोजित केल्या जातात. रेल्वे व एस्.टी.च्या सुविधाही अनेक पटीने वाढल्या आहेत. राहण्या-जेवण्याची सोय सर्रास सर्व ठिकाणी असते. पुन्हा आगाऊ रिझर्वेशन्स केली तर आणखी सोयीचं होतं. या अशा अनेक सुविधांबरोबरच खाजगी वाहनं भाड्याने घेऊनही स्वतंत्रपणे प्रवास करता येतो. अशी खाजगी वाहनं आज सर्वत्र अतिशय मुबलक प्रमाणात उपलब्ध असतात. माणसाने थोडं चौकस असलं की घरबसल्या सर्व माहिती आपल्याला मिळू शकते. या साऱ्या सुविधांमुळे पर्यटन आता खूप सोपं आणि सुलभ झालं आहे.

मराठी माणसाने, निदान महाराष्ट्रातल्या महाराष्ट्रात फिरुन पर्यटनाचा आनंद घ्यावा व एरवी इतिहास आणि भूगोलाच्या पुस्तकात अक्षरबध्द झालेला आपला मायदेश प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहून **'याची देही, याची डोळा'** महाराष्ट्र दर्शनाचा अनोखा आनंद लुटावा म्हणून **'महाराष्ट्र दर्शन'** या पुस्तकाची जुळवाजुळव करण्यात आली आहे. तत्पूर्वी

**'मुंबई दर्शन'** नावाचं पुस्तकही प्रकाशित करण्यात आलं आहे. त्यात मात्र निव्वळ मुंबई शहरातील व मुंबईच्या आसपासच्या स्थळांची माहिती दिलेली आहे. 'मुंबई दर्शन' चे स्वागत अनेक पर्यटकांनी अतिशय उत्स्फूर्तपणे करुन चांगला प्रतिसाद दिलेला आहे. हा अनुभव जमेस धरुन साटम उद्योगातर्फे 'महाराष्ट्र दर्शन' प्रकाशित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाने पर्यटन क्षेत्राचं महत्व ओळखून पर्यटनाचा विकास करण्यासाठी 'महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ' ही स्वायत्त संस्थाच स्थापन केली आहे. या पर्यटन महामंडळातर्फे पर्यटनाच्या प्रचार व प्रसार कार्यावर तर भर दिला जातोच त्याशिवाय पर्यटकांसाठी अनेक सोयी सुविधाही पुरवल्या जातात. वेगवेगळ्या पर्यटनस्थळी बांधण्यात आलेले हॉलिडे कॅम्प्स ही महामंडळातर्फे उपलब्ध असलेली मोठी आणि उपयुक्त सेवा होय. याशिवाय प्रमुख ठिकाणी बस सेवा, ग्रुप टूर्स असे उपक्रम महामंडळ राबवते. पुणे येथील दरवर्षी भरवला जाणारा **'गणेश फेस्टिवल'** किंवा नित्य नेमाने होणारा **'डान्स-म्युझिक फेस्टिवल'** म्हणजे देशी-विदेशी पर्यटकांसाठी आनंदोत्सवच असतो. महामंडळातर्फे असे अनेक उपक्रम राबविले जातात. त्या संबंधीची माहिती व मार्गदर्शन महामंडळाच्या माहिती केंद्रांतून मिळू शकते. त्याशिवाय महामंडळाच्या मुंबई येथील मुख्य कार्यालयाशी संपर्क साधूनही ही माहिती मिळवता येते. छोट्या-मोठया पर्यटनाला चालना देणे तसेच महाराष्ट्रातील पर्यटकांना त्यांच्या आसपास असलेल्या महाराष्ट्रातीलच प्रमुख पर्यटन स्थळांची माहिती देणे, हा **'महाराष्ट्र दर्शन'** च्या प्रकाशनामागील मूळ हेतू आहे. तो सफल होईल ही आशा आहे.

□□□